महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## वृत्तपत्र टिप्पणी

## मेक ईन इंडिया उपक्रमांतर्गत महानिर्मितीचे १.४६ लाख कोटींचे सामंजस्य करार
## उर्जा मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांचे उपस्थितीत करार संपन्न

**(मुंबई - १६/०२/२०१६) :** देशाच्या तसेच राज्याच्या गतिमान विकासासाठी मुंबई येथे सध्या सुरु असलेल्या मेक ईन इंडिया उपक्रमात महानिर्मितीने विविध देशी-विदेशी इच्छुक गुंतवणूकदार कंपन्यांशी सुमारे १.४६ लाख कोटी इतक्या मोठ्या प्रमाणात गुंतवणूकीसाठीचे सामंजस्य करार साध्य केले आहेत. वीजनिर्मितीसंबंधित सौर उर्जा, औष्णिक उर्जा, कोळसा खाणी व वॉशरीज, फ्लाय ॲश व सांडपाणी पुनर्वापर प्रकल्प इ. क्षेत्रात विविध देशी-विदेशी विख्यात कंपन्या व महानिर्मिती यांच्यामध्ये हे सर्व सामंजस्य करार नुकतेच करण्यात आले.

सदर सामंजस्य करारप्रसंगी राज्याचे उर्जा मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. बिपीन श्रीमाळी, संचालक (प्रकल्प) श्री. चंद्रकांत थोटवे, संचालक (संचलन) श्री. विजय सिंह व कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन व सुसंवाद) श्री. सतिश चावरे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी सर्व उपस्थित गुंतवणूकदार कंपन्यांच्या प्रतिनिधींचे स्वागत करुन श्री. बिपीन श्रीमाळी यांनी ह्या सर्व सामंजस्य करार व त्यापुढील रीतसर प्रक्रियेची माहिती सर्व उपस्थितांना दिली.

राज्यातील उर्जा क्षेत्रात इतक्या मोठ्या प्रमाणात उद्योजक कंपन्या गुंतवणूकीस इच्छुक आहेत, हे चित्र फार आशादायक असून आगामी काळात मोठ्या गुंतवणूकीचे हे सर्व प्रकल्प मार्गी लावण्यात राज्य सरकार सर्वतोपरी साह्य करेल, असे ठाम प्रतिपादन याप्रंसगी श्री. बावनकुळे यांनी केले.

याप्रसंगी एकूण सुमारे ६४ गुंतवणूकदार कंपन्यांशी हे सामंजस्य करार करण्यात आले. त्यात प्रामुख्याने औष्णिक प्रकल्प क्षेत्रात मे. सी.एम.ई.सी. चायना (डायना ईपीएल), मे. टेलर पॉवर, मे. टोरेंट पॉवर, मे. डेल्टा मेकॉन्स इंडिया, मे. तोशिबा-जी.एस.डब्ल्यु या कंपन्यांशी, सौर उर्जा क्षेत्रात मे. अदानी ग्रीन एनर्जी लि., मे. राजलक्ष्मी पॉवर लि., मे. हिंदुस्थान मेगापॉवर लि., मे. सस्टेनेबल बिल्डिंग सिस्टीम, मे. वारी एनर्जीज् लि., मे. विंध्यवासिनी मेगास्ट्रक्चर लि., मे. अथा सोलर, मे. एन.एच.पी.सी., मे. लँको, मे. के.सी. पॉवर इन्फ्रा, मे. सन एडिसन, या कंपन्यांशी तर फ्लाय ॲशसंबंधी मे. अंबुजा सिमेंट, मे. इंटिग्रेटेड सिस्टीम, नागपूर या कंपन्यांशी सामंजस्य करार करण्यात आले. त्याचप्रमाणे कोल वॉशरीजसंबंधी मे. भाटिया, मे. गुप्ता ग्लोबल, मे. थीम लॉजिस्टिक्स, मे. एस.एम.एस. लि., व सांडपाणी पुनर्वापर प्रकल्पासंबंधी मे. एस.एम.एस. इन्फ्रा लि. या कंपन्यांशी करार करण्यात आले.

हे सर्व प्रकल्प मार्गी लागल्यानंतर राज्यातील उर्जाक्षेत्राचे चित्र आमूलाग्र बदलणार आहे. नियोजनाच्या पुढील टप्प्यात पुढील रीतसर प्रक्रियेची गतिमान अंमलबजावणी करण्याचे महानिर्मितीचे नियोजन आहे.

******